महात्मा फुले कृषि विद्यापीठ
अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्

मफुकृवि ई वार्ता
एप्रिल २०२२

## पद्मश्री श्री. पोपटराव पवार यांची विद्यापीठाच्या पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाला भेट



**दि. २१ एप्रिल, २०२२.** माती व पाणी यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. दिवसेंदिवस पाणी पातळी खाली जात आहे. ज्याच्याकडे शेततळे आहे तो शेतकरी शेततळे भरुन घेतो, ज्याच्याकडे शेततळे नाही त्याची अवस्था वाईट आहे. यामुळे शेततळे असणारे व शेततळे नसणारे अशी एक विषमतायुक्त दरी समाजात निर्माण होवू पहात आहे. या पार्श्वभूमीवर पाणलोट क्षेत्र विकास संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र भविष्यात देशाला दिशा देणारा प्रकल्प ठरेल. वातावरणातील बदलाचा सामना यशस्वीपणे करण्यासाठी तसेच कार्बन स्थिरीकरण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे असून पाणलोट क्षेत्र विकासाच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या मृद व जल या संसाधनांचे नाविन्यपूर्ण नियोजन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री श्री. पोपटराव पवार यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील ९५३ हेक्टरवरील पाणलोट क्षेत्र प्रकल्पाच्या सुरु असलेल्या कामाबद्दल पाहणी करतांना ते बोलत होते. यावेळी पाणलोट क्षेत्र विकास संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राच्या प्रगतीचा आढावा त्यांनी घेतला. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे व अहमदनगर येथील निसर्ग ज्ञान विज्ञान प्रबोधिनी मंडळाचे अध्यक्ष श्री. कापसे उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यावेळी मार्गदर्शन करतांना म्हणाले की श्री. पोपटराव पवार यांच्या दूरदुष्टीमुळेच विद्यापीठामध्ये पाणलोट क्षेत्र विकासाचे काम होत आहे. कोणतेही मोठे कार्य करायचे असेल तर त्यासाठी अनंत अडचणींवर मात करुन निरंतर प्रयत्न करावे लागतात. हा प्रकल्प निश्चितच सर्वांना दिशा देणारा ठरेल. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. दिलीप पवार यांनी प्रकल्पाविषयी माहिती दिली. डॉ. सचिन नांदगुडे यांनी प्रकल्पाच्या आत्तापर्यंत झालेल्या कामाचा आढावा सादर केला. या भेटी प्रसंगी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. उत्तम चव्हाण, डॉ. तानाजी नरुटे, डॉ. बापूसाहेब भाकरे, डॉ. मुकुंद शिंदे, डॉ. संजय मंडकमाले, डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बारई यांनी तर आभार डॉ. अतुल अत्रे यांनी मानले. यावेळी मृद व जलसंवर्धन शाखेचे प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

वर्ष :२, अंक क्रं. : १६, एप्रिल, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :२, अंक क्रं. : १६, एप्रिल, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## श्री. किरण कोठारी व श्री. रविंद्र पवार हे आहेत एप्रिल महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ एप्रिल, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील शेतकरी व महात्मा फुले कृषि विद्यापीठात पदवी घेतलेले यशस्वी कृषि उद्योजक यांचा परिचय समस्त शेतकरी वर्गाला आणि विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने कुलगुरु डॉ. पाटील यांनी नविन संकल्पना राबविली आहे. यामध्ये दर महिन्याला एक प्रगतशील शेतकरी व एक कृषि पदविचा कृषि उद्योजक यांच्या कार्याविषयी माहिती असलेला फलक विद्यापीठ प्रवेशद्वार, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दर्शनी भागात तसेच विद्यार्थी वसतीगृहाचा दर्शनी भागात या ठिकाणी लावण्यात येतो तसेच विद्यापीठाच्या दहा जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्रे आणि कृषि विज्ञान केंद्रे येथील प्रवेशद्वाराजवळ लावण्यात येतो जेणेकरुन संबंधीत प्रगतशील शेतकरी व कृषि उद्योजक यांच्या कार्याचा परिचय विद्यापीठाला आणि कृषि महाविद्यालयांना, कृषि संशोधन केंद्रांना व कृषि विज्ञान केंद्राना भेट देण्यासाठी येणाऱ्या शेतकरी, अधिकारी व विद्यार्थ्यांना होतो. तसेच या व्यक्तिंचा आदर्श घेऊन तरुण शेतकरी व पदवीधरांना प्रेरणा मिळते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये यांच्या दर्शनीय क्षेत्रात ही आयडॉल्स् प्रत्येक महिन्याला प्रदर्शीत करण्यात येतात.

एप्रिल २०२२ या महिन्याकरीता शेतकरी आयडॉल म्हणुन सातमाने, ता. मालेगांव, जिल्हा नाशिक येथील श्री. रविंद्र पवार व कृषि उद्योजक म्हणुन पुणे कृषि महाविद्यालयातून बी.एस्सी (कृषि) चे शिक्षण घेतलेले मोहोळ जि. सोलापूर येथील श्री. किरण कोठारी यांचा समावेश आहे. श्री. रविंद्र पवार यांनी डाळिंबाची शेती करुन युरोप तसेच आशिया खंडामध्ये निर्यात करत आहेत. त्यांनी शेतीत वापरण्याजोगी यंत्रे स्वतःच्या अनुभवावरुन तयार केली असून ९० टक्के शेती मजुरमुक्त केली आहे. कृषि उद्योजक असलेले श्री. किरण कोठारी यांनी कोठारी ॲग्रीटेक प्रा.लि.च्या माध्यमातून अत्याधुनिक इस्त्रायली तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतकऱ्यांसाठी दर्जेदार उत्पादने तयार केली आहेत. युरोपीयन तंत्रज्ञानावर आधारीत अद्ययावत यंत्रणेच्या मदतीने मॅन्युफॅक्चरींगमध्ये १०० टक्के ॲटोमेशन करुन उत्पादनांची निर्मिती केली. त्यामुळे त्यांना सर्व उत्पादनांचा दर्जा आंतरराष्ट्रीय मानकाप्रमाणे ठेवण्यात यश आले आहे.

वर्ष :२, अंक क्रं. : १६, एप्रिल, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व केंद्रिय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, मुंबई यांच्यामध्ये नॅनो गंधकावर संशोधनासाठी सामंजस्य करार



**दि. १ एप्रिल, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व केंद्रिय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, मुंबई यांच्यामध्ये नॅनो गंधकाचा खत म्हणून वापरासाठीच्या संशोधनासाठी सामंजस्य करार केंद्रिय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, मुंबई येथे करण्यात आला. सदर करारावर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील तसेच केंद्रिय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या संचालिका डॉ. श्रीमती सुजाता सक्सेना यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी केंद्रिय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, मुंबई येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोककुमार भारीमल्ला, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बापूसाहेब भाकरे,शास्त्रज्ञ डॉ. मनोज महावर व डॉ. अनिल दुरगुडे उपस्थित होते. या करारामध्ये केंद्रिय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, मुंबई यांनी नॅनो गंधक तयार केले आहे. सदर कराराचा मुख्य उद्देश नॅनो गंधकाचा सोयाबीन या पिकाच्या उत्पादनावर होणारा परिणाम संदर्भात तीन वर्षांसाठी घेण्यात येणाऱ्या कृषि विद्यापीठातील मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागात प्रयोगांचा अभ्यास करणे हा आहे. तेलबिया पिकांसाठी लागणाऱ्या गंधकाच्या मात्रा नॅनो खतांच्या माध्यमातून कसा वापरता येईल याबद्दल संशोधन होणार आहे. सदर करार कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला.

या प्रसंगी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केंद्रिय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, मुंबई येथे नॅनो खतांच्या संदर्भातील संशोधन कार्याचे तसेच त्या संस्थेच्या होणाऱ्या प्रगतीविषयी प्रशंसा केली. तसेच हा करार शेतकऱ्यांसाठी खूप मोलाचा ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्रिय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या संचालिका डॉ. श्रीमती सुजाता सक्सेना यांनी याप्रसंगी आपले विचार मांडतांना महात्मा फुले कृषि विद्यापीठ करीत असलेल्या विविध क्षेत्रातील संशोधन कार्याचे तसेच प्रकल्पामध्ये सहभागी होण्याचे मान्य केल्याबद्दल अभिनंदन केले व कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील व शास्त्रज्ञांचे आभार मानले. यावेळी उपस्थितांचे स्वागत व संशोधनाची रुपरेषा डॉ. बापूसाहेब भाकरे यांनी विशद केली. तसेच डॉ. अनिल दुरगुडे यांनी विद्यापीठामध्ये होत असलेल्या नॅनो खतांच्या संदर्भातील कामाची माहिती उपस्थितांना दिली. केंद्रिय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, मुंबई येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोककुमार भारीमल्ला यांनी नॅनो खतांची निर्मिती कशा पध्दतीने केली जाते व त्याची उपयुक्तता शेतकऱ्यांसाठी कशी महत्वाची आहे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. शास्त्रज्ञ डॉ. मनोज

महावर यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील आचार्य पदवीचे शिक्षण घेणारे व नॅनो खतांवर संशोधन करणारे विद्यार्थी उपस्थित होते.

## पेरु फळपिकावरील कार्यशाळेचे आयोजन





**दि. २१ एप्रिल, २०२२.** पेरु हे फळ सामान्य माणसाचे सफरचंद आहे. पेरु पिकाचे शेतापासून मार्केटमध्ये जाईपर्यंत अंदाजे ४० टक्के नुकसान हे काढणीपश्चात हाताळणीदरम्यान होते. सध्या पेरुच्या कमी क्षेत्राबरोबरच कमी उत्पादकता ही मोठी समस्या आहे. कृषि विद्यापीठाने सरदार, लखनौ–४९ यासारखे पेरुचे दर्जेदार वाण आतापर्यंत संशोधीत केले आहे. काढणीपश्चात तंत्रज्ञानावरही संशोधन विद्यापीठामध्ये झाले आहे. त्याचा फायदा पेरु उत्पादक शेतकरी बांधवांनी घेतल्यास त्यांना फायदा होईल. तसेच मॅग्नेट संस्थेच्या सहकार्याने शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त क्षेत्रावर पेरुची व्यापारी तत्वावर लागवड करावी असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. सहकार व पणन विभाग, महाराष्ट्र शासन, आशियायी विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ॲग्रीबिझीनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने पेरु पीक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी, विपणन, प्रक्रिया संबंधी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन महात्मा फुले कृषि विद्यापीठात करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ. पाटील बोलत होते. यावेळी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, मॅग्नेटचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव व सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे उपस्थित होते.

यावेळी डॉ. शरद गडाख आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की संपूर्ण देशात फळपिकांखाली सर्वात जास्त क्षेत्र असलेले म्हणुन महाराष्ट्र राज्य ओळखले जाते. महाराष्ट्रात २३ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली असल्यामुळे फळपिकांची लागवड मोठ्या प्रमाणात झाली. यामध्ये पेरु हे महत्वाचे फळ पीक आहे. बदलत्या हवामानासाठी पेरुच्या नविन जाती निर्माण करणे, कमी उंचीच्या जाती विकसीत करणे, उत्पादन खर्च कमी करणे यावर संशोधन होणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. अमोल यादव म्हणाले की शेतकरी कुटुंबाचे आर्थिक स्थान बळकट करण्याबरोबरच कार्यक्षम असे विपणनाचे जाळे महाराष्ट्रभर तयार करणे हा या मॅग्नेट प्रकल्पाचा उद्देश आहे. या कार्यशाळेमध्ये तांत्रिक मार्गदर्शनात अखिल महाराष्ट्र पेरु उत्पादक व संशोधन संघाचे अध्यक्ष श्री. विनायकराव दंडवते, वरुण ॲग्रो नाशिकच्या कार्यकारी संचालक सौ. मनिषा धात्रक, मॅग्नेटचे आंतरराष्ट्रीय तज्ञ डॉ. विजय सचदेव, बाभळेश्वर येथील कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ डॉ. पुरुषोत्तम हेंद्रे, अ.भा.स. फळसंशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सतिश जाधव, विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. विक्रम कड, डॉ. विकास

भालेराव, डॉ. रणजीत कडू यांनी पेरु पिकावरील विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पेरु पीक माहिती पुस्तीकाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी तर आभार मॅग्नेटचे प्रकल्प उपसंचालक श्री. नितीन पाटील यांनी मानले. कार्यशाळेसाठी सहकार व पणन विभाग आणि मॅग्नेट प्रकल्पाचे सर्व अधिकारी व पेरु उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## पुणे येथील कृषि महाविद्यालयाच्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागातील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास ४० के.डब्ल्यू. चा सौर उर्जा प्रकल्प मंजूर



**दि. १४ एप्रिल,२०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत पुणे कृषि महाविद्यालयाच्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागामार्फत देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र हा प्रकल्प महाराष्ट्र शासनाने सुरु केला आहे. या प्रकल्पांतर्गत भारतातील दुधासाठी प्रसिद्ध साहिवाल, राठी, थारपारकर, गीर, लाल सिंधी तसेच महाराष्ट्रातील प्रसिद्ध खिलार या जातीच्या गायींचे संगोपन व संवर्धन करून त्यांचा तुलनात्मक अभ्यास केला जात आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून विषमुक्त शेती व सेंद्रिय व नैसर्गिक शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यात येणार आहे. सेंद्रिय नैसर्गिक शेती करण्यासाठी उर्जेच्या गरजांबाबत देखील नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करत स्वयंपूर्ण असणे गरजेचे आहे. यासाठी महाराष्ट्र एनर्जी डेवलप्मेंट ऐन्सी (MEDA) मार्फत ४० के.डब्ल्यू. क्षमतेचा सौर उर्जा प्रकल्प देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास मंजूर करण्यात आला असून महाराष्ट्र एनर्जी डेवलप्मेंट एजन्सी हा सौर उर्जा प्रकल्प स्थापित व कार्यान्वित करणार आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.पी.जी.पाटील यांचे प्रयत्नाने हा सौर उर्जा प्रकल्प मंजूर झाला आहे. त्यामुळे संपूर्ण गोशाळा (डेअरी) साठी लागणारी उर्जा वापराच्या ठिकाणीच नैसर्गिक पद्धतीने निर्माण करून पशूपालन करताना नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्यावरण पूरक पद्धतीने कसा वापर करता येऊ शकतो याचे प्रात्यक्षिक गोपालकांना व शेतकऱ्यांना दाखविता येणार आहे. महाराष्ट्रातील हा प्रथम व एकमेव सौर उर्जा आधारीत पशुपालन प्रकल्प ठरणार आहे. हा प्रकल्प मंजूर होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासळकर यांनी विशेष परिश्रम घेतले. महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (चएऊअ) चे महासंचालक श्री. रवींद्र जगताप, श्री. समुद्रगुप्त पाटील, विभागीय महाव्यवस्थापक, पुणे विभाग व श्री. विजय कोते, उपसंचालक (लेखा) यांनी हा प्रकल्प मिळवून देण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

वर्ष :२, अंक क्रं. : १६, एप्रिल, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कृषि विद्यापीठात उत्साहात साजरी



**दि. १४ एप्रिल, २०२२.** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतीकारी विचार हे केवळ आपल्या देशात सिमीत करुन चालणार नाही तर ते संपूर्ण जगासाठी आणि मानव कल्याणासाठी आहेत. म्हणुनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने विश्वरत्न आहेत असे विचार अहमदनगर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. सुनिल कवडे यांनी मानले. ते महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजीत कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन मार्गदर्शन करतांना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी व्यासपीठावर संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, हळगांव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान आणि क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारताचे संविधान या विषयावर बोलतांना डॉ. सुनिल कवडे पुढे म्हणाले की बाबासाहेबांकडे प्रचंड ज्ञानसंपंन्नता होती, खडतर परिस्थितीतून त्यांनी शिक्षण घेतले आणि या ज्ञानाचा उपयोग त्यांनी समाजासाठी आणि देशासाठी केला. त्यांची तुलना केवळ कार्ल मार्क्स या प्रख्यात विद्वानाशीच होऊ शकते. समाजाने मानसिक गुलामगिरी बाजूला ठेवून संशोधक वृत्ती आणि मानवी प्रतिष्ठा व मानवी कल्याण जोपासण्याची आज खरी आवश्यकता असल्याचे मत डॉ. कवडे यांनी मांडले.

अध्यक्षीय मार्गदर्शनात कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की भारतामध्ये अनेक महापुरुष झाले, परंतु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव सुवर्णअक्षराने लिहिले जाईल. ते केवळ राज्यघटनेचे शिल्पकार नव्हते तर एक शिक्षणतज्ञ, अर्थतज्ञ, प्रसिध्द कायदेपंडीत, उत्कृष्ट संसदपटू आणि प्रभावी वक्ते होते. त्यांनी समाजक्रांतीचे बीज रोवले आणि समाजात जागृती केली व नवचैतन्य निर्माण केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान यांनी केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुणे कृषि महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण निदेशक प्रा. पुष्पशील शेळके यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करुन त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी श्री. रणजीतसिंह जगदाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाला विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
एप्रिल २०२२

वर्ष :२, अंक क्र. : १६, एप्रिल, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## एफ.एम.सी. इंडिया प्रा.लि. कंपनी व महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये सामंजस्य करार



**दि. २१ एप्रिल, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे एफ.एम.सी. इंडिया प्रा.लि., मुंबई व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, एफ.एम.सी. इंडियाचे संशोधन विभागाचे संचालक डॉ. आनंदकृष्णन बलरामन, कृषि किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी.एस. पाटील, कंपनीचे कार्पोरेट विभागाचे राष्ट्रीय प्रमुख डॉ. बकुळ जोशी, मुख्य मार्केटींग ऑफिसर डॉ. सी.ए.एस. नायडू, कंपनीचे महाराष्ट्र राज्याचे फिल्ड डेव्हलोपमेंट मॅनेजर श्री. जयेश चौधरी उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की एफ.एम.सी. इंडिया प्रा.लि., मुंबई यांच्यातर्फे पदव्युत्तर व आचार्य पदवीच्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी देण्यात येणारी फेलोशीप हा अत्यंत महत्वाचा उपक्रम आहे. यामुळे विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्तीला चालना मिळून त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करीयर करण्यासाठी त्यांना मोलाचे सहकार्य उपलब्ध होईल. डॉ. प्रमोद रसाळ यांनी विद्यापीठातील शिक्षण उपक्रमांविषयी माहिती दिली. यावेळी डॉ. आनंदकृष्णन यांनी कंपनी विविध क्षेत्रात करत असलेल्या कामाबद्दल माहिती दिली. डॉ. बकुळ जोशी यांनी कंपनीच्या फेलोशीप उपक्रमाविषयी माहिती दिली. डॉ. सी.ए.एस. नायडू यांनी कंपनीच्या स्थापनेपासूनची माहिती दिली. यावेळी एम.एस्सी. (कृषि) किटकशास्त्र विषयात शिक्षण घेणाऱ्या ज्ञानेश्वर चूते या विद्यार्थ्यास कंपनीची फेलोशीप देण्यात आली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. सी.एस. पाटील यांनी केले. श्री. जयेश चौधरी यांनी उन्हाळ्यामध्ये कोणती काळजी घ्यायची या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अजय हजारे यांनी तर आभार डॉ. तानाजी नरुटे यांनी मानले. यावेळी सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, विभाग प्रमुख डॉ. तानाजी नरुटे, डॉ. बापुसाहेब भाकरे, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे, एफ.एम.सी. इंडिया प्रा.लि. कंपनीचे महाराष्ट्राचे विक्री संचालक श्री. योगेंद्र जाडोन उपस्थित होते. यावेळी कृषि किटकशास्त्र, कृषिविद्या, फलोद्यान, मृदविज्ञान आणि कृषि रसायन शास्त्र व रोग शास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ, प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

मफुकृवि ई वार्ता
एप्रिल २०२२

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन




**दि. २६ एप्रिल, २०२२.** भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त देशभरात दि. २५ ते ३० एप्रिल, २०२२ या दरम्यान सर्व विभागांमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याअंतर्गत किसान भागीदारी, प्राथमिकता हमारी अभियानामध्ये कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव येथे शेतकरी मेळावा व कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन खासदार मा. श्री. श्रीनिवास पाटील उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना कृषि विज्ञान केंद्राने शेतकऱ्यांसाठीचे कृषि मंदिर व्हावे असे प्रतिपादन केले. यापुढे त्यांनी शेती करताना शेतकऱ्यांनी माती परिक्षण करुन शास्त्रज्ञांच्या सल्ल्याने बियाणे निवड करावी तसेच किडरोगाचे नियंत्रण करुन भरघोस उत्पादन घ्यावे, मालाची साठवणुक, मुल्यवर्धन करुन शेतकऱ्यांनी स्वत: बाजारपेठ निर्मिती करावी. योग्यरित्या ब्रँडिग केल्यास योग्य बाजारभाव मिळेल व शेतकरी समृध्द होईल. बाजारपेठेचा अभ्यास करुन शेतकऱ्यांनी पिकांची निवड करावी, असे प्रतिपादन केले. याप्रसंगी आयोजित कृषि प्रदर्शनातील विविध स्टॉलला मान्यवरांनी व उपस्थित शेतकऱ्यांनी भेटी देऊन उद्योजकांशी सुसंवाद साधला. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक प्रा. मोहन शिर्के तसेच तालुका कृषि अधिकारी, सातारा श्री. हरिश्चंद्र धुमाळ यांनी शेतकऱ्यांशी सुसंवाद साधला. यानंतर पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त, डॉ. अंकुश परिहार यांनीपशुपालक शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्डची माहिती दिली. तसेच सहा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. पी. के. पवार यांनी पशुसंवर्धन विभागाच्या योजनांबाबत माहिती दिली. यावेळी सरपंच ग्रामपंचायत, बोरगांव श्री. सतिश साळुंखे उपस्थित होते. श्री. मोहन लाड यांचा शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित केल्याबद्दल गौरव करण्यात आला. यावेळी सातारा जिल्हयातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. कृषि प्रदर्शनाचे व्यवस्थापन श्री. शरद काळे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महेश बाबर, सुत्रसंचालन श्री. सागर सकटे व आभार प्रदर्शन डॉ. कल्याण बाबर यांनी केले.

मफुकृवि ई वार्ता
एप्रिल २०२२



## भारतीय शेती टिकविण्याच्या दृष्टीने मुख्य शास्त्रीय नव कल्पनांची मागणी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



**दि. २८ एप्रिल, २०२२.** भारतामध्ये जैवविविधता खुप आहे. हरितक्रांतीनंतर पाण्याचा तसेच रासायनिक खते व किटकनाशकांचा अमर्याद वापर मोठ्या प्रमाणात वाढला. त्यामुळे जैवविविधतेला धोका निर्माण झाला. भातासारख्या पिकातील जवळजवळ ५ हजार पारंपारीक वाण नष्ट झाले. या वाणांमध्ये रोग व किडींना प्रतिकारक असे अनेक चांगले गुणधर्म होते. त्यांचा वापर करुन अनेक नविन वाण विकसीत करता येवू शकतात. त्यामुळे अशा वाणांचे जतन होणे गरजेचे आहे. हे सर्व काम जैव तंत्रज्ञान, रोप पैदास व अनुवंशंकीय शास्त्रज्ञांनी एकत्र येवून तयार केलेल्या नविन संशोधनाची अंमलबजावणी प्रभावीपणे केली तरच भारतीय शेती टिकविता येईल असे प्रतिपादन छत्तीसगड, रायपूर येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या राष्ट्रीय जैविक तणाव व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. पी.के. घोष यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील जागतिक बॅक अर्थसहाय्यीत, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र व कृषि विद्या विभाग, पदव्युत्तर महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने भारतीय शेती टिकविण्याच्या दृष्टीने मुख्य शास्त्रीय नव कल्पनांची मागणी या विषयावर प्रमुख मार्गदर्शन करतांना डॉ. पी.के. घोष बोलत होते. यावेळी कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके, सहनिमंत्रक व कास्ट प्रकल्पाचे सह प्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे, आयोजन सचिव व कृषि विद्या विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते.

यावेळी डॉ. घोष पुढे म्हणाले की वातावरणातील बदलाचा सर्वात मोठा परिणाम विविध पिकांच्या उत्पादन क्षतमेवर होत असून अन्नधान्याचे उत्पादन व पुरवठा ही साखळी मोठ्या प्रमाणात बाधित झालेली दिसून येत आहे. वातावरणातील हवेत असलेल्या मिथेन, कार्बनडॉय ऑक्साईड व नायट्रस ऑक्साईड यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. यामधील नायट्रस ऑक्साईड हा वायु मानवी जीवनासाठी अत्यंत धोकादायक असून खतांमधील युरीयाच्या अतिवापरामुळे हवेतील नायट्रस ऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे. यामुळे वातावरणातील तापमान वाढुन वेगवेगळ्या पिकातील वाणांचा प्रतिसाद कमी होत असून यावर जैव तंत्रज्ञानातील नविन संशोधनाने अन्नधान्यातील पौष्टीक सुरक्षा तसेच उत्पन्न सुरक्षा टिकविता येईल. शेतीचे निटनेटके संवर्धन, वैविध्यपूर्ण फेरबदल व काटेकोरपणे केली जाणारी शेती या तंत्रज्ञानाचा वापर करुन आपण भविष्यात शेतीतील उत्पन्न वाढ तसेच माती, पाणी व पर्यावरण या नैसर्गीक संसाधनांचे रक्षण करु शकु असे यावेळी ते म्हणाले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. मुकुंद शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी तर आभार डॉ. उल्हास सुर्वे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ व विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे किसान भागीदारी प्राथमिकता हमारी अभियान निमित्ताने शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न




**दि. २६ एप्रिल, २०२२.** अटारी, पुणे झोन–८, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत किसान भागीदारी प्राथमिकता हमारी अभियान निमित्ताने शेतकरी मेळाव्याचे आयोजन कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर, प्रमुख पाहुणे म्हणून अग्रणी बँक, धुळेचे जिल्हा प्रबंधक श्री. मनोज दास, नाबार्ड, धुळेचे जिल्हा प्रबंधक श्री. विवेक पाटील, आत्मा, धुळेचे प्रकल्प उपसंचालक श्री. सुनीलकुमार राठी, धुळेचे उपविभागीय कृषि अधिकारी श्री. शांताराम मालपुरे, पशुसंवर्धन विभागाचे सहा. उपयुक्त डॉ.मिलिंद भंगे, कृषि विज्ञान केंद्र, धुळेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, माविम,धुळेचे प्रकल्प अधिकारी श्री. भदाणे, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. दिलीप पाटील, उपाध्यक्ष श्री. हितेंद्र गिरासे, प्रा. श्रीधर देसले उपस्थित होते.

या मेळाव्याचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले, प्रास्तविकामध्ये त्यांनी किसान भागीदारी प्राथमिकता हमारी अभियान कार्यक्रमाचा उद्देश तसेच महत्व उपस्थितांना अवगत करून दिले. राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय कृषि एवं किसान कल्याण मंत्री, भारत सरकार मा. श्री. नरेंद्रसिंग तोमर यांनी आभासी पटलाद्वारे किसान भागीदारी प्राथमिकता हमारी अभियानाचे उद्घाटन केले. श्री. शांताराम मालपुरे यांनी कृषि विभागाच्या विविध योजनांविषयी माहिती दिली. श्री. सुनीलकुमार राठी यांनी स्मार्ट प्रकल्पा विषयी माहिती देत आत्मा कार्यालयामार्फत राबवीत असलेल्या उपक्रमांविषयी माहिती दिली. यासोबतच डॉ.मिलिंद भंगे, यांनी पशुसवर्धन विभागाच्या विविध योजनांविषयी माहिती देत मार्गदर्शन केले. श्री.मनोज दास व श्री. विवेक पाटील यांनी बँकअंतर्गत योजनांविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ.चिंतामणी देवकर यांनी शेतीमधील बदल स्वीकारत उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढ कसे करता येईल याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे सांगितले. त्यासोबतच जमिनीचा पोत चांगला ठेवण्याकरीता टप्प्याटप्प्याने सेंद्रिय शेती उत्पादनाकडे लक्ष केंद्रित करावे असे आवाहन केले. जास्तीत जास्त युवकांनी, शेतकरी, महिला

यांनी सहभाग घ्यावा असे ते म्हणाले. सदर शेतकरी मेळाव्यात महाराष्ट्र शासन, कृषि विभाग पुरस्कारप्राप्त धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सन्मानचिन्ह देत मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये श्री. शरद पवार, पढावद, शिंदखेडा, श्री. वाल्मिक पाटील, चांदे, धुळे, श्री. कुमारसिंग पावरा, न्यू बोऱ्हाडी, शिरपूर आणि डॉ. नरेंद्र भदाणे, सामोडे, साक्री यांचा समावेश होता. तसेच कृषि विज्ञान केंद्रामार्फत विविध कृषि प्रक्रिया युक्त पदार्थांचे व विविध पुस्तकांचे प्रदर्शन दालन लावण्यात आले होते. या मेळाव्याचे संपूर्ण संचालन डॉ.धनराज चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. अतिश पाटील यांनी मानले. शेतकरी मेळावा यशस्वी करण्यासाठी डॉ. पंकज पाटील, श्री. जगदीश काथेपुरी, श्री. रोहित कडू, श्रीमती अमृता राऊत, श्री. जयराम गावित, कु. प्राची काळे, कु. स्वप्नाली कौटे, श्री. स्वप्नील महाजन, श्री. रमेश शिंदे, श्री. कुमार भोये, श्री. मधुसूदन अहिरे, कृषि विभाग, आत्मा कार्यालाचे अधिकारी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथील हरितगृह प्रकल्पास नव्या प्रशिक्षणार्थींची संजीवनी

**दि. २६ एप्रिल, २०२२.** कोरोना महामारीने जिथे भल्याभल्या अर्थव्यवस्था डबघाईला आणल्या तिथे छोट्या छोट्या संस्था, संघटना, उपक्रमांची किती वाताहात झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि महाविद्यालय, पुणे येथील उद्यानविद्या विभागांतर्गत सन २००१ साली उच्च तंत्रज्ञान पुष्प व भाजीपाला प्रकल्प एक पथदर्शी प्रकल्प म्हणून सुरु करण्यात आला. या प्रकल्पाने अल्पावधीतच प्रकल्प सुरु करण्याची सर्व उद्दिष्ट्ये साध्य करत एक वेगळीच उंची गाठली. हा प्रकल्प राज्यातीलच नव्हे तर देशातील हरितगृह उद्योगाला दिशादर्शक ठरला. या प्रकल्पात कृषि पदवीका पूर्ण केलेल्या उमेदवारांना पुष्प व भाजीपाला उत्पादनाच्या हरितगृहातील उच्च तंत्रज्ञानाबद्दल प्रशिक्षित करण्यात येते. प्रकल्पातील लागवडीपासून मालाच्या विपणन विक्रीपर्यंतच्या सर्व उत्पादक तांत्रिक बाबींची काळजी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थी स्वत: प्रात्यक्षिकांद्वारे घेतात. परंतु, कोरोना महामारीच्या सुरुवातीच्या काळात केलेल्या लॉकडाऊनमध्ये प्रकल्पात सुरु असलेले प्रशिक्षण बंद झाले. सन २०१९-२० पर्यंत नियमित सुरु असणारे उच्च तंत्रज्ञान पुष्प व भाजीपाला प्रकल्पातील प्रशिक्षण सन २०२०-२१ मध्ये आयोजित करता येऊ शकले नाही. याचा परिणाम म्हणून गुलाब, जरबेरा, कार्नेशन, ढोबळी मिरची व काकडी अश्या फुले व भाजीपाला पिकांचे उत्पादन पूर्णत: थांबले.

सन २०२१-२२ मध्ये हे प्रशिक्षण पुन्हा सुरु करणेत आले. उपलब्ध ३५ जागांवर केवळ २० प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतला. परंतु, या नव्या प्रशिक्षणार्थींचा प्रवेश म्हणजे या प्रकल्पास नवसंजीवनी ठरला आहे. नियोजित जुलै महिन्यात सुरु होणाऱ्या प्रशिक्षणास डिसेंबर २०२१ इतक्या उशीरा सुरुवात होऊन देखील नव्या प्रशिक्षणार्थींनी मागील चार महिन्यात ५२ गुंठे गुलाब, २० गुंठे जरबेरा, १० गुंठे जीप्सोफिला व १० गुंठे ढोबळी मिरचीची लागवड पूर्ण केली असून अजून १८ गुंठे जरबेरा लागवड नियोजित आहे. या सर्व पिकांपासून रु. ३५ लाख रुपये मिळतील असा अंदाज आहे. लवकरच हा प्रकल्प आपल्या नावाप्रमाणेच उच्च तंत्रज्ञान, निपुण मनुष्यबळ व उच्च मूल्य पिकांचे उत्पादन पूर्ण क्षमतेनी सुरु करेल. उच्च तंत्रज्ञान पुष्प व भाजीपाला प्रकल्पाची धुरा प्रकल्प व्यवस्थापक डॉ. सचिन चव्हाण प्रकल्प चमू श्री. महेंद्र वळसे, श्री. निबांजी सोनवणे, श्री. वसंत वाघ व श्री. सुभाष वाघमारे यांच्या मदतीने सांभाळतात. प्रकल्पास कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील तसेच महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

वर्ष :२, अंक क्रं. : १६, एप्रिल, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## मौजे ढुमेवाडी (दिवे), ता. पुरंदर येथे सिताफळ बहार व्यवस्थापन प्रशिक्षण संपन्न



**दि. ८ एप्रिल, २०२२.** अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी आणि तालुका कृषि अधिकारी, पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. विजय कोंढाळकर, मौजे ढुमेवाडी (दिवे) यांच्या बागेत सिताफळ बहार व्यवस्थापन व बोर्डोमिश्रण बनविण्याचे प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथील डॉ. प्रदीप दळवे यांनी सिताफळ बहार व्यवस्थापन तर सिताफळ रोग कीड नियंत्रण याविषयावर डॉ. युवराज बालगुडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्री. सूरज जाधव, तालुका कृषि अधिकारी, पुरंदर यांनी फळबाग लागवडीसंदर्भात असलेल्या शासकीय योजनांची माहिती दिली. डॉ. दळवे यांनी सिताफळ बागेत झाडाला वळण देणे व छाटणीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. सदर कार्यक्रमावेळी श्री. शेखर कांबळे, मंडळ कृषि अधिकारी, सासवड, श्री. गणेश जगताप, कृषि पर्यवेक्षक, सासवड, श्री. योगेश पवार, श्री. पंकज केंगार, श्री. आशिष गायकवाड, अमृता बोराटे, कृषि सहाय्यक आणि दिवे पंचक्रोशीतील सिताफळ उत्पादक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## मौजे पांगारे, ता. पुरंदर येथे सिताफळ बहार व्यवस्थापन प्रशिक्षणाचे आयोजन



**दिनांक १२ एप्रिल, २०२२.** सिताफळ हे पुरंदर तालुक्यातील महत्त्वाचे फळपिक असून अत्यंत कमी पाणी, कमी खर्चात आणि अत्यल्प मशागतीत येणारे चांगले आर्थिक उत्पन्न मिळवून देणारे पीक आहे. इतर पिकांच्या तुलनेने सिताफळावर रोग आणि किडींचा प्रादुर्भाव कमी प्रमाणावर होतो. परंतु, क्षेत्र वाढण्याबरोबरच अलीकडे सिताफळामध्ये विविध रोग आणि

किडींचा प्रादुर्भाव कमीजास्त प्रमाणात आढळून येत आहे. सिताफळाचे हंगामाच्या सुरुवातीपासूनच योग्य व्यवस्थापन केल्यास भविष्यात होणारे नुकसान टाळता येणे शक्य आहे. सिताफळामध्ये जून महिन्यात नैसर्गिक बहर येतो. परंतु, पाण्याची उपलब्धता असल्यास लवकर म्हणजे उन्हाळाच्या सुरुवातीस बहार धरता येतो. उन्हाळी बहर धरणाऱ्या काही शेतकऱ्यांनी झाडांची छाटणी पूर्ण केली आहे तर काही शेतकरी छाटणी करण्याच्या तयारीत आहेत.

शेतकऱ्यांना हंगामाच्या सुरुवातीपासूनच योग्य मार्गदर्शनाकरिता अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी आणि तालुका कृषि अधिकारी, पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री नंदकुमार कोंडे, मौजे पांगारे यांच्या बागेत सिताफळ बहार व्यवस्थापन व बोर्डोमिश्रण बनविण्याचे प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथील डॉ. प्रदीप दळवे यांनी सिताफळ बहार व्यवस्थापन तर सिताफळ रोग कीड नियंत्रण या विषयावर डॉ. युवराज बालगुडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्री. संजय फडतरे, मंडळ कृषि अधिकारी, परिंचे यांनी फळबाग लागवडीसंदर्भात असलेल्या शासकीय योजनांची माहिती दिली. डॉ. दळवी यांनी सिताफळ बागेत झाडाला वळण देणे व छाटणीचे प्रात्यक्षिक करून दाखविले आणि डॉ. बालगुडे यांनी बोर्डोमिश्रण बनविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. सदर कार्यक्रमावेळी श्री संदीप कदम, कृषि पर्यवेक्षक, श्रीमती स्वप्नाली चौंडकर, कृषि सहाय्यक आणि पंगारे व सटलवाडी भागातील सिताफळ उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## अभिनंदन

## जागतिक बौध्दिक संपदा दिवस कार्यक्रमात डॉ. उत्तम चव्हाण मा. राज्यपालांच्या हस्ते सन्मानीत



**दि. २६ एप्रिल, २०२२.** राजभवन, मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात मा. राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण यांना कृषि विद्यापीठाने नोंदविलेल्या नानकटाईच्या पेटंटचे प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले. राजभवनात नुकतेच जागतिक बौध्दिक संपदा दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भौगोलीक मानांकन प्राप्त करणारे प्रगतशील शेतकरी व उद्योजक उपस्थित होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या बेकरी युनिटमध्ये तयार

होणाऱ्या नानकटाई कुकीज/बिस्किटांना भारतीय बौद्धिक मालमत्ता/संपदा अधिकार प्रमाणपत्र अर्थात पेटंट अधिनियम १९७० च्या कायद्यानुसार २० वर्षांसाठी प्रदान करण्यात आले आहे. या पेटंटसाठी डॉ. उत्तम चव्हाण यांनी परिश्रम घेतले होते. बेकरी युनिटच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख आणि अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ यांनी विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण यांचे अभिनंदन केले आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अधिकारी व विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेच्या पारितोषिकांनी सन्मानीत





**दि. २७ एप्रिल, २०२२.** मुंबई येथील एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातील पाटकर सभागृहात सन २०१६-१७ ते २०२०-२१ ह्या मागील पाच वर्षांच्या राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेच्या उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक, महाविद्यालय व उत्कृष्ट विद्यापीठाचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. उदय सामंत उपस्थित होते. या प्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि महाविद्यालय, सोनई येथील प्रा. संदीप तांबे (२०१८-१९ व २०१९-२०) व कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालय, लोणी येथील प्रा. प्रविण गायकर (२०२०-२१) यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून गौरविण्यात आले. सन २०१६-१७ चे उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणुन कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथील विष्णु गोरे, सन २०१७-१८ या वर्षासाठीचे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी येथील अथर्व शिंदे, कृषि महाविद्यालय, पुणे येथील शैलेश जोगदंड (२०१९-२०) व अनिकेत वाकळे (२०२०-२१) या चार स्वयंसेवकांना राज्यस्तरीय पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. पारितोषिक वितरण प्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहाण, पुणे कृषि महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दिपक सावळे, डॉ. राजेंद्र भिलारे, डॉ. नजीर तांबोळी व डॉ. अभय पाटील विद्यार्थ्यांसमवेत उपस्थित होते. पारितोषिक प्राप्त अधिकारी व विद्यार्थी यांचे या यशाबद्दल कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. सुनिल मासळकर आणि डॉ. उत्तम होले यांनी अभिनंदन केले.

## डॉ. मिलिंद अहिरे यांची इंडियन रिसर्च जर्नल ऑफ एक्सटेंशन एजुकेशनच्या संपादकीय मंडळावर निवड



**दि. ६ एप्रिल, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पदव्युत्तर महाविद्यालयातील कृषि विस्तार व संज्ञापन विभाग प्रमुख आणि हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांची आग्रा येथील विस्तार शिक्षण सोसायटीचे इंडियन रिसर्च जर्नल ऑफ एक्सटेंशन एजुकेशनच्या संपादकीय मंडळावर पुढील तीन वर्षासाठी नेमणूक करण्यात आली आहे. या नवीन नेमणुकीमुळे डॉ. अहिरे यांचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## सोलापूर येथील कृषि हवामान संशोधन प्रकल्पातील संपर्क शेतकरी श्री. सुभाष भोसले यांना "उत्कृष्ट शेतकरी" पुरस्कार प्रदान




**दि. २६ एप्रिल, २०२२.** भारतीय कृषि संशोधन परिषद, नवी दिल्ली अंतर्गत क्रिडा, हैदराबाद यांचे वतीने सन २०२२ साठी उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार हा सोलापूर जिल्हयातील बोरामणी येथील प्रगतशील शेतकरी श्री. सुभाष भोसले यांना ३८ व्या क्रिडा, हैदराबाद संस्थेच्या स्थापना दिनी डॉ. गुरुबच्चन सिंग, संचालक, अे.एस.आर.बी., नवी दिल्ली यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कारासाठी अखिल भारतीय पातळीवर २५ राज्यांमध्ये कार्यरत असलेल्या अखिल भारतीय कृषि हवामान संशोधन प्रकल्पांमधून मानांकने प्राप्त झाली होती. सदर मानांकनामधून सोलापूर येथील कृषि हवामान संशोधन प्रकल्पातील संपर्क शेतकरी श्री. सुभाष भोसले यांची निवड करण्यात आली. बदलत्या हवामानात शेती करणे जिकरीचे झाले

असून बदलत्या हवामानाच्या अनुषंगाने दिर्घ, मध्यम व कमी कालावधीच्या अंदाजास अनुसरुन कृषि हवामान संशोधन प्रकल्प, विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर यांचे मार्फत दर आठवडयास देण्यात येणाऱ्या कृषि हवामानावर आधारीत कृषि सल्ला व हवामान अंदाज यांचा उपयोग शेतीमध्ये विविध पिके, पीक पध्दती व फळबाग शेती यामध्ये योग्यरित्या अवलंब करून कोरडवाहू शेतीमध्ये फायदेशीर उत्पन्न घेत त्यांनी १०० एकर जमिनीवर याची अंमलबजावणी यशस्वीपणे राबविली आहे. सदर पुरस्कार स्विकारताना विभागीय कृषि संशोधन केंद्राचे प्रभारी  डॉ. जे. डी. जाधव, कृषि हवामान शास्त्रज्ञ डॉ. व्ही. टी. जाधव व कृषि विद्यावेत्ता डॉ. व्ही. एम. लोंढे उपस्थित होते. सदर प्रकल्पाच्या यशस्वी वाटचालीसाठी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय अमृतसागर व प्रकल्प समन्वयक डॉ. एस.के. बल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

## मे महिन्यातील कामांचा तपशील

### भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूग पीक काढणीयोग्य तयार झाले म्हणजे पाने पिवळी पडू लागतात, शेंगाचे टरफल टणक बनते व टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागल्यास पिकाची काढणीकरुन भुईमूगाच्या शेंगा चांगल्या वाळवून साठवणूक करावी.

### बागायती कापूस

- मे महिन्याच्या मध्यापर्यंत जमीन चांगली तापल्यानंतर २ ते ३ वखराच्या आडव्या व उभ्या पाळ्या देवून ढेकळे फोडून शेत सपाट करून घ्यावे.
- शेवटच्या वखर पाळी अगोदर हेक्टरी १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत शेतात पसरावे.
- बीटी कपाशीसाठी पेरणीच्यावेळी हेक्टरी २५ किलो नत्र, ६५ किलो स्फुरद, व ६५ किलो पालाश द्यावे.
- बिगर बीटी कपाशीसाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे.
- बीटी कपाशीची लागवड २० मे नंतर ९० सें. मी. X ९० सें. मी., किंवा १२० सें. मी. X ६० सें. मी. सऱ्या पाडून करावी.
- बागायती बिगर बीटी कपाशीची लागवड सोलापूर, सांगली, सातारा व पुणे जिल्ह्यासाठी मार्चचा पहिला पंधरवाडा, अहमदनगर जिल्ह्यासाठी एप्रिलचा पहिला पंधरवाडा तर खानदेश, विदर्भ मराठवाड्यातील जिल्ह्यांसाठी मे चा दुसरा पंधरवाडा या दरम्यान करावी.
- पेरणीपूर्वी एका पिशवीतील बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम अ‍ॅझोटोबॅक्टर किंवा अ‍ॅझोस्पिरीलम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जिवाणू तसेच ५ ग्रॅम ट्रायकोडर्माची बिजप्रक्रिया करून सऱ्या ओलावून पेरणी करावी.
- बीटी कपाशीभोवती ५ टक्के बिगर बीटी कपाशीची (रेफ्युजिया) लागवड करावी.

### ऊस

- सिंचनाची सोय असल्यास सुरु उसाची मोठी बांधणी करुन घ्यावी.
- सुरु उसासाठी मोठया बांधणीच्या वेळी १०० किलो नत्र (२१७ किलो युरिया), ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रती हेक्टरी द्यावे.
- उसाला युरियाची मात्रा देताना निंबोळी पेडींची भुकटी एक किलो व सहा किलो युरिया असे प्रमाण ठेवावे. किंवा निमकोटेड युरिया वापरावा.
- पूर्वहंगामी आणि आडसाली ऊस जोदार वाढीच्या अवस्थेत असून उन्हाळ्यात पाण्याचा ताण पडणार नाही याची दक्षता घ्यावी.
- खोडवा उसाला (खोडवा ठेवल्यानंतर १३५ दिवसांनी) पहारीच्या सहाय्याने रासायनिक खतांचा दुसरा हप्ता म्हणजेच १२५ किलो नत्र (२७२ किलो युरिया) ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी द्यावा.
- काणी व गवताळ वाढीची बेटे समूळ काढून नष्ट करावीत.
- उसासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयांपर्यंतच्या सुरू व

खोडवा उसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति आठवडा प्रति एकरी ६.५ किलो युरीया, ४.५ किलो मोनोअमोनिअम फॉस्फेट व २ किलो पांढरे म्युरेट ऑफ पोटॅश ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.

- ऊस पिकासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन पाणी व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करावा.
- ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता कमी आहे अशा ठिकाणी यापुढे पाणी देताना एक आड सरीतुन पाणी द्यावे.
- पाण्याचा ताण पडत असल्यास उभ्या पिकातील खालची पक्व झालेली तसेच वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावी. जेणे करून पाण्याचे बाष्पीभवन कमी होवून जमिनीत ओलावा टिकवून राहण्यास मदत होईल.
- पिकास पाण्याचा ताण असल्यास लागणीनंतर ६०, १२० आणि १८० दिवसांनी २% म्युरेट ऑफ पोटॅश व २% युरीया यांचे मिश्रण करून पिकावर फवारणी करावी.

## कडधान्य

### मूग आणि उडिद

- पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवच्या २ पाळ्या दयाव्यात, काडीकचरा वेचून घ्यावा.
- हेक्टरी ५ टन शेणखत

### तूर

- हेक्टरी ५ टन कंपोस्ट / शेणखत टाकावे.
- पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवच्या २-३ पाळ्या देऊन शेत पेरणीस तयार ठेवावे.

### भात

- पूर्वमशागत : भात पिकाच्या योग्य वाढीसाठी शेताची योग्य प्रकारे पूर्वमशागत करणे अत्यंत महत्त्वाचे असते. पूर्वमशागतीमुळे जमिनीच्या विविध थरांची उलथापालथ होते आणि काही प्रमाणात तण, कीड व रोगांचेही नियंत्रण होते.
- सेंद्रीय खतांचा वापर : नांगरणीच्या वेळी हेक्टरी १० मे.टन शेणखत अथवा कंपोस्ट खत मातीमध्ये पूर्णपणे मिसळून द्यावे.

### नाचणी

- जमिनीचा प्रकार : उुळ
- जमिनीची खोली : २५-३० सें.मी.
- जमिनीचा पोत : वाळूमय ते पोयटा मिश्रण
- सामू : ६.० ते ७.३, विद्युत वाहकता : ०.१० - ०.४० डेसिसायमन/ मिटर
- शेतीची नांगरट करणे, कुळवणी करणे, शेतातील धसकटे वेचणे
- जमिनीची मशागत : पुर्वमशागत : एक नांगरणी उतारास आडवी आणि दोन कुळवाच्या पाळ्या देणे. पेरणीपूर्वी मशागत करताना सेंद्रिय खताची मात्रा ५ टन/हेक्टरी मिसळावे.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवाडा – जमिनीची खोल नांगरट करावी.

### बाजरी

- खोल नांगरट व कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. शेवटच्या कुळवणी अगोदर प्रति हेक्टरी ५ टन शेणखत शेतात मिसळावेत.

### सोयाबीन

- खोल नांगरट व कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. शेवटच्या कुळवणी अगोदर प्रति हेक्टरी ५ टन शेणखत मिसळावे.

### फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब – पाणी व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष द्यावे. जैवीक आच्छादन करावे.शक्यतो फुट काढणी करू नये. फळांना पेपरबॅग लावून संरक्षण करावे खोड किडीचे नियंत्रण करावे.
- बोर – १५ मे दरम्यान छाटणी करावी.
- आवळा – संरक्षित पाणी द्यावे.
- अंजीर – संरक्षित पाणी द्यावे.
- जांभूळ – संरक्षित पाणी द्यावे. खोडांची साल पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी गेरू व कॉपर ऑक्झीक्लोराईड + क्लोरोपायरीफॉस पेस्ट लावावी.
- कागदी लिंबू – उन्हाळ्यात ८–१० दिवसाचे अंतराने पाणी द्यावे. रोगट, किडग्रस्त व वाळलेल्या फांद्याची छाटणी करावी. पिठ्या ढेकूण : क्लोरोपायरीफॉस २० टक्के २० मिली / १० लि. पाण्यातून फवारावे. कोळी : डायकोफॉल २०–२५ मिली/१० लि. पाण्यातून फवारावे. झाडांच्या खोडावरील व फांद्यांवरील डिंक खरडून टाकावे. खोडावर जमिनीपासून २.५ फूट अंतरापर्यंत बोर्डोपेस्ट लावावी.

### भाजीपाला व्यवस्थापन

- भेंडी व गवार पिकाची काढणी करावी.
- वेलवर्गीय भाजीपाला काढणीचे काम वेळेवर करावे.
- उन्हाळी, मिरची व वांगी पीक फुलोरा अवस्थेत उष्ण व जास्त तापमाणामुळे फुलगळ होण्याची शक्यता असते.
- उन्हाळी मिरची व वांगी पिकामधील फुलगळीचे प्रमाण कमी करून फळधारणा वाढविण्यासाठी संजीवकाची व सूक्ष्म अन्नद्रव्याची फवारणी करावी तसेच पिकाचे उष्ण तापमानापासून संरक्षणासाठी सभोवताल व प्रत्येक चार ओळीनंतर मका पिकाची लागवड करावी.
- टोमॅटो पिकाचे उन्हापासून संरक्षण करावे.
- किड व रोगाचा प्रार्दुभाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी योग्य उपाय करावेत.

### आले

- आले लागवड १५ एप्रिल पासुन ते जुनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करावी.
- लागवडीसाठी वरदा, रिजाथा, माहिम, महिमा यासुधारीत जातींची निवड करावी.
- कंद ४ ते ५ सें.मी. खोल लावावेत. कंद पुर्ण झाकले जातील याची दक्षता घ्यावी. आल्याला मध्यम प्रकारची सुर्यप्रकाशाची आवश्यकता असते.
- जमिनीच्या उताराप्रमाणे लागणीची पध्दत निश्चित करुन जमिनीवर उताराच्या दिशेने बेड उठवून घ्यावेत. बेड एकसारखे सपाट होतील याची काळजी घ्यावी.
- बेड तयार करताना ट्रॅक्टरच्या फनपाळ्याचे सरळ बेड तयार करावे. लागणीचे वेळी आढीत ठेवलेले बियाणे बाहेर काढून त्याचे एकसारखे तुकडे करुन (मोड) घ्यावेत.
- आल्याचा तुकडा ज्या दिवशी जमिनीत पुरला जाईल त्याच दिवशी त्या जमिनीस भरपूर पाणी मिळालेच पाहिजे. पाणी जमिनीस एवढे द्यावे किमान लावलेल्या तुकड्याच्या खाली चार ते पाच इंच संपूर्ण ओल गेलेली असावी. अन्यथा दुसऱ्या दिवशी पुन्हा तेवढेच पाणी द्यावे. व त्यानंतरच्या पाण्याच्या पाळ्या जमिनीच्या प्रतवारीनुसार एक दिवसा आड एक दिवस किंवा दोन आड एक दिवस अशी ओल कायमस्वरुपी राखून ठेवली जाईल एवढेच पाणी द्यावे.
- लागणीपासून आठ दिवसांनी हलकी भर टाकावी, कारण लागणी वेळी लांब तुकड्याची टोके जमिनीच्या पृष्ठभागाबरोबर असतात.त्यास उष्णतेची झळ लागू नये किंवा उघडे असणारे डोळे खराब होऊ नयेत म्हणून या भरीची आवश्यकता आहे.

### पशुसंवर्धन

- मे महिन्याच्या पहिल्या आठवडयात पशुवैद्यकाच्या सल्लयाने जनावरांना जंतनाशक औषध पाजावे व शेवटच्या आठवडयात लाळखुरकत, फ–या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचन घ्याव्यात.
- उष्माघातामध्ये सर्व प्रथम जनावराला थंड ठिकाणी बांधावे. त्यानंतर थंड पाण्यात ओला केलेला तळवटाचा, पोत्याचा तुकडा जनावराच्या दोन्ही शिंगाच्या मध्ये बांधून तो सतत ओला राहिल याची दक्षता घ्यावी हलके पाचक गुळमिश्रीत खाद्य द्यावे. भरपुर थंड पाणी पिण्यास द्यावे तत्काळ पशुवैद्यकांना बोलावून त्यांचे सल्याणे जनावरांवर आवश्यक औषधोपचार करावा.
- गोठयातील हवा खेळती राहिल याची दक्षता घ्यावी. तसेच गोठयात पंखे किंवा पाण्याचे फवारे उपलब्ध ठेवावे. मचुळ पाण्याचे व्यवस्थापन करावे.

### अवजारे

#### ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो–मेकॅनिकली नियंत्रित ऑफसेट फळबागा व्यवस्थापन यंत्र

- फळबागेतील जारवा तोडणे तसेच वरंबा फोडण्याकरिता उपयुक्त.
- ३५ अश्वशक्ती आणि त्यापेक्षा जास्त ट्रॅक्टरने सहज चालते.
- ट्रॅक्टर पी.टी.ओ. यांत्रिक शक्ती तसेच हायड्रोलिक शक्तीचा वापर.

- फळबागेतील झाडांना कोणतीही इजा न होता एकाच वेळी फळबागेतील जारवा तोडणे तसेच वरंबा फोडणे हि दोन्ही कामे सहज करता येतात.
- हायड्रो–मेकॅनिकली नियंत्रित सेन्सर्स वापरले आहे.
- एका तासामध्ये ०.१३ हेक्टर क्षेत्र व्यवस्थापन करते.
- प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ७२%
- पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चामध्ये ४८ % निवळ बचत.
- या यंत्राच्या वापरामुळे मजुरांची, श्रमाची तसेच वेळेची बचत.

**प्रकाशक** : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. खेमचंद खैरनार**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र
**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४५५/२०२२**